## प्रकरण पाचवे

## यशवंतांची भाषाशैली : स्वरुप आणि चिकित्सा

पद्यमय साहित्याला आपण कविता म्हणतो, पद्यात्मकता हे त्याचे बाह्यलक्षण मानले जाते. पूर्वीच्या काळी पाठांतराची सोय म्हणून सर्वच साहित्य पद्यात असे मात्र. मुद्रण कलेचा शोध लागल्यानंतर ही स्थिती बदलती. गद्यातून साहित्याची निर्मीती होऊ लागली. गद्य आणि पद्य ही साहित्याच्या अभिव्यक्तीची दोन माध्यमे झाली आणि त्यामुळे कवितेचे क्षेत्र अधिक शुध्द् झाले. (१) कवितेने स्वतःचे अंगभूत विशेष प्रकट केले. गद्याचे आणि गद्यात्मक वाङ्‌यमाचेही आवाहन प्रामुख्याने तर्कबुध्दीला असते तर काव्याचे आवाहन भावनात्मकतेला असते. सौंदर्यानुभुती व आनंदानुभुती देणे हे कवितेचे प्रमुख कार्य. (२) कवितेच्या पद्यमयतेमुळे , नादमयतेमुळे आणि आशयघनतेमुळे हे कार्य सहज व प्रभावीपणे साधले जाते.

साहित्य हे शब्दांचे, आणि भाषेचे माध्यम स्विकारुन साकारत असते. चित्रकाराचे माध्यम रंग आणि ब्रश, शिल्पकाराचे दगड, संगितकाराचे त्याचे वाद्य हे जसे असते तसे साहित्यीकाला शब्दांचे माध्यम स्विकारावे लागते. शब्दांना अर्थ असतात आणि त्यात आलेला शब्द हा अचुक अर्थ प्रतिपादन करणारा असावा लागतो कारण कविला अभिप्रेत असलेला आशय तो शब्दांद्वारेच प्रकट करत असतो. तेव्हा शब्द हे नेमकेपणाने ,निवड करुन वापरावे लागतात. भाषेचे प्राथमिक कार्य म्हणजे संदेश वहन. हे सांभाळुन नवनवीन भाषीक रुपे वापरुन संदेश वहनाच्या मुळ कार्यात अधिक अर्थसमृध्दी, अधिक विशिष्टिकरण करत राहणे ही साहित्यीक भाषेची कसोटी ठरते. (३) कारण जुने शब्द, जुन्या प्रतिमा त्याच त्या वापरुन रसहानी होते. यासाठी कविला नविन भाषीक प्रयोगांचाही अवलंब करावा लागतो. शब्दाला एक घाट असतो. नाद असतो, लय असते. ति अचुक पकडुन रचना केल्यास कवितेत चेतना निर्माण होते. कवितेत गेयताही महत्वाची असते. यासाठी शब्दांची मोडतोड करावी लागते. नादमयता असणारे दुसरे समानार्थी शब्द योजावे लागतात. नादमयता नसेल तर 'कविता' राहणार नाही ती गद्यच वाटेल. कवितेत तीव्र उत्कट भावना असतात आणि या तिव्र उत्कट भावना तालबध्द रुपातच प्रकट होणे स्वाभावीक असते आणि ही तालबध्दता किंवा लय हा कवितेचा विशीष्ट भावानुभावाचा स्वरुपामुळे अवतरलेला असतो. अभिजात कवितेचे हे लक्षणच असते. (४) भाषा हे काव्याचे बहिरंग असले तरी भावात्मक आशय व्यक्त करण्याचे ते माध्यम असते. आशयाला प्रकट करण्याचे काम भाषेवरच अवलंबुन असते आणि त्यामुळे प्रत्येक कविची विशीष्ट अशी भाषीक वैशीष्ट्ये असणारी भाषा असते.

**यशवंताची भाषाशैली -**

यशवंतांच्या भाषाशैलीचे रुप बघताना त्यांची पार्श्वभूमी बघावी लागतेच. त्यांच्यावर लहानपणापासुनच संस्कार झाले. ते संतांच्या आणि पंडीती वळणाच्या कवितेचे. ज्यांना ते काव्यक्षेत्रामधले आपले गुरु मानीत ते साधुदास हे पंडिती कवि. लहानपणापासुनच समर्थांचे साहीत्य वाचलेले आणि ऐकलेले होते. आणि नंतर रविकिरण मंडळात प्रवेश केल्यावर तेथील सुशिक्षीत कविमित्रांचा कितपत प्रभाव पडला. त्या प्रभावापासुन (विशेषतः माधव ज्युलीयनांच्या फार्सीच्या प्रभावापासुन). ते कितपत वाचु शकले ते आदी बाबी विचारात घ्याव्या लागतात. त्याचबरोबर रविकिरण मंडळातले ते सर्वात जास्त लोकप्रिय कवि. त्यांचे काव्यगायन ऐकून भारावून न गेलेला अरसीक विरळ! लोकांना मंत्रमुग्ध करुन ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत होते. आशयाबरोबरच तो व्यक्त करण्याची भाषाही तेवढीच महत्वाची. यशवंतांची भाषा मुद्दाम नटवलेली, सजवलेली नाही. ती सहजस्फुर्त आहे. परभाषेचा प्रभावही तिच्यावर फारसा पडलेला दिसत नाही. ती मराठमोळी आहे. आणि आपले मराठमोळेपण तीने कायम टिकवले आहे. संस्कृतोद्भव शब्द, पंडिती वळणाची भाषा, फार्सीतील काही शब्द याबरोबरच ग्रामीण भाषेतील काही अनगड शब्दही एकाचे वेळी येतात. त्यामुळे त्यांची भाषा स्वतंत्र अस्तित्व दाखवते. कोणाच्या प्रभावाखाली असल्यासारखी वाटत नाही.

कवितेत जो आशय व्यक्त करायचा असतो, तो शब्दांद्वारे, शब्द अर्थवाही असतात. शब्दांना अर्थ असतात. एकाच शब्दाचे अनेक अर्थही होतात. त्यामुळे शब्दांचा वापर कविला तोलुनमापुनच करावा लागतो. जातीवंत कविला हा प्रयत्न फारसा करावा लागत नाही. योग्य शब्द त्याच्या मनातुन आपोआप उमटतात. मात्र भाषेत अस्तित्वात असणारे शब्दच त्याला वापरावे लागतात. त्यामुळे तत्कालीन भाषेचा प्रभाव त्याच्या भाषेवर पडतो. कवितेची असणारी सांकेतीक बंधनेही पडतात. आणि जानपद कविता पुर्णपणे ग्रामीण भाषेत लिहीण्याची क्षमता असूनही नागरी भाषा वापरली आहे.

त्यांच्या भाषेवर सुरुवातीला रामदासांचा आणि नंतर साधुदासांचा प्रभाव होता. रविकिरण मंडळात आल्यावरही हे जुने संस्कार ते विसरु शकले नाहीत. त्यांच्या कवितात प्रतिमायोजनेसाठी वापरलेले पुराणातील दाखले ही त्यांची जुनी निष्ठाच व्यक्त करतात. त्याचा विचार पुढे येणारच आहे. निसर्गातील प्रतिमाही ते वापरतात. पण फार अल्पशी, त्यांचे समकालीन प्रसिध्द कादंबरीकार वि.स.खांडेकर हे ज्याप्रमाणे आपल्या कादंबऱ्या सुभाषीतवजा वाक्यांची खैरात करतात त्याप्रमाणे यशवंतांनीही आपल्या कवितेत सुभाषीते निर्माण केली आहेत.

रविकीरण मंडळाने काव्यगायनाचे कार्यक्रम करुन कविता जनमानसापर्यंत पोहोचवली. जनसामान्यांपर्यंत कविता पोहोचवयाची म्हणल्यानंतर ती गेयरुपातच असायला हवी. म्हणून काव्यगायनाचा मार्ग स्विकारला. काव्यविश्वातील

सगळेच तारे निखळुन पडल्यामुळे काव्यविश्वात अंधार झाला. लोकांतही कवितेविषयी अनावड होती. लोकांत कवितेची आवड निर्माण करणेसाठी समुदायासमोर कविता सादर केली. त्यामुळे गाण्यासाठी Mob appealling साठी तडजोडी कराव्या लागत - व शब्दांना घासुनपुसुन घेणे या कामासाठी अनुप्रासासाठी कोणतेही शब्द आणणे आणि वरवरची गेयता निर्माण करणे म्हणजे गानसुलभता निर्माण करणे असा इथे प्रकार आहे. (५) असे नागनाथ कोतापल्ले म्हणतात. तर रविकिरण मंडळाच्या कामात साहित्याची भाषा बोथट झाली होती असे भालचंद्र नेमाडे म्हणतात. (६) यशवंतांची भाषा कशी घडली, तिच्यावर कोणकोणते परिणाम झाले हे आतापर्यंत पाहीले. आता त्यांच्या भाषेचे स्वरुप कसे आहे ते विविध भाषाविशेषांवर नजर टाकुन पहावयाचे आहे पण त्याअगोदर यशवंतांच्या कवितेची प्रकृतीही लक्षात घ्यावी लागेल.

**यशवंताच्या कवितेची प्रकृती -**

यशवंतांची कविता ही प्रामुख्याने भावकविता आहे. वस्तुनिष्ठ वर्णनात ती कधीच रमत नाही. तसेच कल्पनेच्या साम्राज्यातही रमत नाही. वास्तवाची कटु जाणीव सतत मनाला डाचत असलेने असेल कदाचित.वास्तवाचे भान त्यांच्या कवीतेने कधि सोडले नाही. वास्तवातल्या कटुतेने त्यांचे मन निराश झाले आहे. जिवनात सदैव निराशाच पदरी असलेने त्यांची कविताही निराशावादीपणाचे सुर आळवते. पण उच्च प्रतिचा ध्येयवादही त्यांच्या कवितेतुन दिसुन येतो. यशवंतांची कविता समाजाभिमुख, लोकाभिमुख आहे. त्यांच्या कवितेतुन प्रगट होणारा आशय आपल्याही जिवनाशी साधर्म्य दाखविणारा आहे अशी वाचकांची समजुत होते. त्यांच्या व्यक्तीगत अनुभवांनी कवितेत प्रतिनीधीकता स्विकारलेली दिसते. प्रेमकवितेतही वर विशद केलेली वास्तवाची जाणीव सुटत नाही. त्यामुळे प्रेयसीची आळवणी करताना स्वतःच्या दारीद्रयाचेच तो वर्णन करतो आणि त्याला प्रेयसी हवी आहे ती केवळ तात्पुरत्या मिलनासाठी नव्हे तर आयुष्याची जोडीदारीण होण्यासाठी. या जोडीदारीणीवरचेही निस्सिम प्रेम निष्ठेच्या स्वरुपातही व्यक्त केले आहे. त्यांनी जानपद कवीताही लिहीली आहे. जानपद कवीतातुन जानपद भाषेचाही वापर केला आहे. मात्र केवळ नाविन्याचे आकर्षण म्हणुन ते या विषयाकडे वळलेले नाहीत. इतर कविंपेक्षा अधिक व चांगल्या दर्जाची कौटुंबीक कवीता त्यांनी लिहीली आहे. खंडकाव्याचीही निर्मीती केली आहे. आणि त्यातही कुठल्या ना कुठल्या बाबतीत नावीन्य साधले आहे. पण या सर्वच काव्यातून आपले भावगीत कवीपण सोडलेले नाही. 'बंदीशाळा' हे खंडकाव्य कथनपर असुनही त्यात विविध पात्रांच्या तोंडी भावगीते घातली आहेत. 'जयमंगला' हे खंडकाव्य तर भावगीतातुनच साकारले आहे आणि 'काव्यकिरीट' हे प्रसंगवर्णनपर असुनही त्यात राजा, प्रजा, आदिंची मनोगतेच जास्त घातली आहेत. यशवंताच्या

मनाला इतिहासाचे आकर्षण आहे. सुरुवातीच्या काळात यावर स्फुट कवितालेखन करुन त्यांनी हे दाखवीले आहे. तर नंतरच्या कालखंडात दिर्घकाव्य निर्मीती करुन ऐतीहासीक दिर्घकाव्याची वाड्यमात भर घातली आहे. आपल्या जन्मभुमीविषयी म्हणजे महाराष्ट्राविषयीची निष्ठा बऱ्याच कवितांतुन व्यक्त केली आहे. पारतंत्राच्या कालखंडात इंग्रजी सत्तेविरुध्द् आक्रमक पवीत्रा घ्यायला ही कवीता सांगते. त्यांच्या या विविध काव्यरचनेतून त्यांच्या कवितेची प्रकृती कळते. त्यांच्या कवितेतुन जी भाषीक वैशीष्टये व्यक्त होतात तीही यशवंतांची कविता समजुन घ्यायला उपयोगी ठरते.

**(१) यशवंतांच्या कवितेच्या भाषेचे स्वरुप -**

**औपरोधीक -**

समाजाजील दुष्ट प्रवृत्ती, विसंगत यामुळे यशवंत चिडतात व त्यांच्या भाषेला उपरोधाची धार येते. सामाजीक आशय व्यक्त करणाऱ्या कवितांत ही औपरोधीक भाषा वापरलेली दिसते. अशा कविता म्हणजे दिवंगताचे स्मारक, नवी घडी इ. पण सर्वसाधारणपणे त्यांनी अशी भाषा फार थोडया कवितातून लिहीली आहे.

**प्रासादिक -**

यशवंतांची कवति सर्वांना समजेल अशा भाषेत लिहीलेली आहे. म्हणजे तिच्यात काव्यगुण नाहीत असे नाही. इतर काव्यगुण तिच्यात आहेतच प्रासादिकता हाच जिचा वैशिष्टयपुर्ण अंगभूत गुण झाला आहे. कविता सर्वांना समजावी या हेतूने लिहीली गेल्याने तिच्यात प्रसादगुण उमटला पण प्रासादिकता आणताना कवितेचा सुर, लय शब्दांचे सौंदर्य जपण्याचा प्रयत्न केला आहे.

**गेयतानुरुप -**

यशवंताची सर्व कविता गेय स्वरुपाची आहे. काव्यगायनाकरवी त्यांनी कविता जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले म्हणून त्यांच्या कवितेत गेयता आहे. ती गेयता फक्त कवीने स्वतःपुरतीच आणली नाही तर वाचकालाही कविता गेय चालीवर म्हणता यावी हा उद्देश त्यापाठीमागे आहे. या गेयतेसाठी विविध वृत्त चालींचा वापर कवितेत केला आहे. यमक साधले आहे अनुप्रास अलंकार वापरले आहेत. शब्दातूनही लयबध्दता नादमयता वापरलेली आहेत.

**सुभाषितात्मक -**

कवितेत सार्वकाली आशय व्यक्त करणारी अनेक सुभाषितांवजा वाक्यांची योजना केलेली दिसते. साहित्य हे जीवनभाव्य असते स्वतःला आलेल्या अनुभवांचे अथवा सोदार्ह भावनेजे इतरांचे अनुभव अनुभवुन तो त्यांचे चित्रण तो

साहित्यात करतो. त्यातून काही निष्कर्षही काढतो. आपण या निष्कर्ष अथवा नियमांशी परिचीत असतो पण नित्याच्या व्यवहारात त्याची आठवण राहात नाही अनुभवजन्य ज्ञानही तो काही प्रमाणात विसरतो पण हेच ज्ञान साहित्यातुन त्याला मिळते आणि त्याला आनंद होतो. हे ज्ञान सुभाषितात्मक वाळ्यातून नीट ग्रहण करता येते. लक्षात ठेवता येते. काव्यातुन हे सुभाषितवजा विचार अधिक प्रभावी रुप धारण करतात. वि.स.खांडेकरांची भाषा जशी सुभाषितात्मक आहे त्याच प्रकारे यशवंतांनीही सुभाषितात्मक भाषेचा वापर आपल्या कवितातुन केला आहे. उदा. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी, नरमाई उपकारक ठरते परिस्थीतीमध्ये कडक, त्याचबरोबर निसर्गातील घटकांच्या आधारेही मानवी जीवनाजील सत्ये दृगोच्चार होतात - उदा. ग्रिष्माचा दाह काय वाळल्या तृणा! राचेला जाळील का अग्नी तो पुन्हा, अशी कितीतरी अनेक.

**विनोदी -**

यशवंत प्रामुख्याने गंभीर स्वरुपाची कविता लिहीणारे कवी आहेत. वास्तवदर्शीपणा हा त्यांच्या कवितेचा विशेष आहे. त्यामुळे विनोदाचा सुर कुठे अंमलात नाही क्वचीत कुठे संपूर्ण कविता विनोदी चुटक्यासारखी लिहीली आहे. उदा. त्यांची 'प्रियाराधन' ही कविता.

**स्वगतपर -**

यशवंतांचा कवितेची भाषा ही नेहमी स्वगतपर असते. प्रथमपुरुषी आत्मनिवेदनातुन ते आपल्या भावना मांडतात. ते मुख्यतः भावगीत कवी असल्याने भावोत्कटतेला जास्त महत्व देतात. त्यामुळे त्यांची प्रत्येक कविता (काही कवितांचा अपवाद वगळता) स्वगतपरच असते.

**(२) शब्दांचे विशेष -**

कवितेत शब्द हेही आपले काम बजावत असतात. शब्दांद्वारेही कवीचे वेगळेपण जाणवते, शब्द वापरण्याची प्रत्येक कविची लकब वेगळी असते. मनातील आशय व्यक्त करण्यासाठी विशिष्ट शब्दांचाच नेहमी आश्रय घेताला जातो. काही शब्द तर कवीच्या खास आवडीचे असतात. कविच्या या विशीष्ट शब्दयोजनेमुळे कवितेलाही एक वेगळे वळण प्राप्त होते. यशवंतांची कविताही शब्दयोजनेच्या बाबतीत आपले वेगळेपण दाखविणारी आहे.

**संस्कृत, हिंदी, फार्सी शब्दयोजना -**

त्यांच्या कवितेत संस्कृतप्रचुर शब्द जसे येतात जसेच हिंदी, फार्सी भाषेतील शब्दही येतात. मात्र ते अगदी सहजपणे आलेले आहेत मुददाम वापरलेले नाहीत.

**संस्कृत -**

त्वदागमी, रौद्र, दशदिभ्रान्ती, मुद्राविकल, तापानले, नृत्यांगना, यज्ञयाग, क्षीर, समीर इत्यादी तर कवळ, हिंपुटी, चर्चीणे इत्यादीरामदासांच्या वाङ्मयातील शब्दही येतात.

हिंदी,उर्दु, फार्सी - तकदीर, जिंदगी, चिराग, सुहाग, बिछायत, सौकत, सलीली, हरबख्त, बुनियाद, रफाकली, गरवन, हिम्मतवाला, मुकाम, जंजीर,कब्ज इत्यादी शब्दांचा वापरही केला आहे. यातील फार्सी शब्दांचा प्रभाव माधवराव ज्युलीयनांच्यामुळे आला असेल 'छत्रपती शिवराय' काव्यात तर उर्दु शब्द भरमसाठ आले आहेत.

**ग्रामीण बोलीतील शब्द -**

यशवंतांचे बालपण ग्रामीण भागात गेले, त्यांच्या भाषेत त्यामुळेच ग्रामीण भाषेतील शब्द, ग्रामीण जीवनातील संकल्पना इत्यादी येतात. नागर बोलीतील शब्दांची अशिष्ट रुपेही येतात. उदा. होवं-हबं, फुराण - स्फुरण, धोंडा - दगड, पल्याडचे - पलीकडचे, कलागती - भांडण, ततं - तिथे, तर काही शब्द जसेच्या तसे येतात - फुसका, कुरी, चाडं, कुड, जिनगानी, ताईत, खुला, वापी, दांडगा, पुंडावा इत्यादी. ग्रामीण जीवनातील काही संकल्पना - यात्रेतील छबीना आणि त्यापुढे चालणारी काठी, जमिनीत वाढणाऱ्या भुईमुगाच्या शेंगांचा दृष्टांत तसेच विस्तवावर राख जमुन तो पिचु लागतो हा तपशील यातून त्यांची बारीक निरीक्षणशक्ती प्रत्ययाला येते. या ग्रामीण शब्दांच्या जोडीला अस्सल नागरी शब्द घेऊन त्यांची संधी जोडुन चमत्कारीक शब्द निर्माण करतात. उदा. बापवधाचा, पल्याडचे ते धाम, कुडासन्नीध विस्तव, वसनाला रफु केला. भिन्न प्रकृतीचे शब्द एकत्र येऊन वेगळाच शब्दसंकर घडविला आहे.

**सर्वनामांचा वैशिष्टपुर्ण वापर -**

यशवंतांची कवितेत वापरलेली सर्वनामे वैशिष्टपूर्ण जुन्या मराठीचा आणि संस्कृतचा प्रभाव दाखविणारी आहेत. आणि याच प्रकारची सर्वनामे सर्वत्र वापरलेली आहेत. उदा. मदीय,तदीय, मम, जै, माते, यदिय, जया, तया, मजकडे, तुजकडे, तूते, रत्वा, निज, तुवा, तव, जवे, सवे, केवि, जेवि, किमर्थ, इत्यादी.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

क्रियापदांच्या बाबतीतही काही प्रमाणात संस्कृतरचना स्वीकारली आहे. सजे,धजे, पण गद्यप्राय अशीच क्रियापदे बहुतेक आली आहेत. बनले,उठले,पावे,पुलनी,वधनी,मिरविलेस,दाटले इ.

घर या अर्थाचा गेही हा शब्द वापरण्याचा यशवंतांना खुपच सोस आहे. रिपू,रूधीर,सलील,इत्यादी शब्द सतत वापरात येतात.

(३) अलंकारिकता -

यशवंतांची शब्दकला अलंकारांनी नटलेली आहे. उपमा,भंपक,अनुप्रास,श्लेष यमकादी अलंकारांचा वापर यशवंतांनी आपल्या कवितातून केला आहे. छंदोबध्दतेप्रमाणेच अलंकारिकता हेही कवितेचे बाह्य लेणेच होय. अलंकार व छंदाच्या चातुर्याने वापर करुन पांडीत्यप्रदर्शनाची पंडिती कवींची वृत्ती आधुनीक काळात लोप पावली होती. काव्याच्या बहिरंगापेक्षा अंतरंगाला, काव्याच्या प्राणतत्वाला महत्व दिले गेले होते पण जे काही सांगायचे ते नटवुन सजवुन सांगून अधिक परिणामकारक करणे यासाठी अलंकारिकतेचा वापर केला होताच पण ही अलंकारिकता साधनरुप असते साध्य नसते त्यामुळे काव्याच्या आशयाला बाधा येत नाही. यमकाचा भरमसाठ वापर सोडला तर बाकीच्या अलंकारांच्या बाबतीत यशवंत थोडे उदासीनच राहीले आहेत.

यमके -

यमकाशिवाय यशवंतांची कविता सापडणे विरळच.यमकाचा वापरही त्यांनी विशेष चमत्कृतीने साधला आहे. कुठे शेवटच्या शब्दात शेवटचे अक्षर सारखे येऊन शब्दात स्वराचे साधर्म्य साधले आहे. एकसारखेच पण भिन्न अर्थाचे शब्द वापरून श्लेष अलंकार साधला आहे. शेवटची दोन अक्षरे व्यंजन-स्वराचा फेरफार न करता शब्द वापरून यमक साधले आहे तर कुठे सबंध कवितेत शेवटचा वर्ण न बदलता कविता लिहीली आहे.

(१)स्वराचे साधर्म्य दाखविणारे यमक पुढील शब्दांद्वारे साधले आहे - मारा-धारा,आज-साज,आठवणी-साठवणी, जीव-शीव,धीर-शीर,कूल-भूल,दंडात-बंडात,शब्दाला-शब्दाला इत्यादी.

(२)शेवटची दोन अक्षरे समासासारखी घेऊन यमक साधणारी काही ऊदाहरणे - चमेलीचा-मेलीचा,घेताना-ताना,जीव-निर्जीव,हास-इतिहास,संदेश-देश,गात-अंगात,कहाणीत-हाणीत,दिमाखाने-खाने,नीच-देवयामीच,रस्त्याचे-फिस्त्याचे इत्यादी.

कवितेपासून अलग करून ही यमके पहिली म्हणजे त्यातील अर्थभिन्नता दिसते म्हणजे यमक समानार्थी असते असते असे नव्हे पण हे यमक जाणूनबूजून साधलेले वाटते. पण प्रत्यक्ष कविता वाचताना हे जाणवत नाही.

(३) याशिवाय शेवटचे शब्द सारखेच असतात पण त्यात अर्थभिन्नता असते - राहू (राहणे) - राहू (राहू -केतु) वास (सुगंध) वास (रहिवास) हार (माळ) हार (पराजय), मानी (स्वाभिमान), मानी (मानाते), कोरा (स्वच्छ) - कोरा (कोरणे), वाटा (वाटणी) - वाटा (रस्ते)

(४) तर काहि कवितेत संपूर्ण कवितेत शेवटचे अक्षर एकसारखे असते. उदा. दैवास आव्हान (यशोधन) ही कविता आ हारवर आणि ल/ळ हे व्यंजन खुशाल - दुशाल - लाल - गाल - खलाल - नारळ कंगाल इत्यादी

(५) संपुर्ण कडव्यातच यमक साधलेले असते

भागवुन माझ्या भुका

सावरुन माझ्या चुका

जागरुक माझ्या सुखा

(श्रेयाचे वाटेकरी - वाकळ)

इथे यमक साधले आहे गेयताही निर्माण झाली आहे आणि अर्थपूर्णताही साधली आहे.

**अनुप्रास -**

कवितेला नादमयता प्राप्त होण्यासाठी अनुप्रास या अलंकाराचीही मदत होते. यात सुरुवातीचे अक्षर समान असते यशवंतांनी आपल्या कवितातून या अलंकारची योजनाही केलेली आहे ति अशी - मूर्तिकाराची कला मूर्तिमंत, देखूनीया दैवदुर्विलास भूलथापा भुलविती, हिरव्या गवताखाली हिरवी नागिण लपलेली, बेगुमान - बेफाम, लुडकुड करुनी लावी लाडीगोडी, कुबेर कन्या काय भुले प्रेमास नराचा नारायण, रमणी राणे, घणाचे घाव घालावे.

मनोरे मानसी ,पिवळे पातळ, पिवळी काया, पिवळी चाफेकळी

गाली लाली ,अधरी लाली, लाली पायातली

अशा प्रकारे त्यांनी अनुप्रास योजून कवितेला नादमयता प्राप्त करुन दिली आहे. त्यांनी अनुप्रास योजून कवितेला

नादमयता प्राप्त करुन दिली आहे. काही काही वेळा हा अनुप्रास साधण्यासाठी अर्थ हातीही कोणी आहे उदा. नथनीपाणी, लाडीक वाणी, सौंदर्याची खाणी श्यामाराणी, तिला म्हणोनी जनता बहु वाखाणी (बंदीशाळा) त्यांना शब्दातील नादाचे किती वेड आहे हे या अनुप्रासांच्या उदाहरणांवरुन दिसते.

श्लेष -

अनेकार्थता प्रकट करणारा हा अलंकार पंडिती कविंचा प्रिय अलंकार होता. 'औषध नलगे मजला' हे तर या अलंकाराचे उदाहरण सर्वश्रूत आहेच. रामजोशीही आडपडद्याने शृंगारीक चित्रण करण्यासाठी श्लेष अलंकाराचीच योजना करुन अशी द्वैर्थी रचना करतो. यशवंतांनी एकाच वाक्यातून अथवा ओळीतून दोन अर्थ न साधता समान दिसणारे पण भिन्न अर्थाचे शब्द शेजारी - शेजारी योजून (प्रामूख्याने यमक साधण्यासाठी) श्लेष अलंकार साधला आहे.

उदा. - (१) ठिबकता घाम वा टिपे

निजपदराने जी टिपे

(२) दागिने तुझे हे देवा नेऊ नये का मी

काय तुझे वैभव माझ्या येऊ नये का मी

(३) हा कागद आहे तूमच्या पुढती कोरा

का पर्वत हा त्यामाजी लेणी कोरा

याशिवाय मानी (मानतो) - मानी (स्वाभिमानी),पतंग (कागदी पतंग) - पतंग (फुलपाखरु),राहू (राहणे) - राहू (राहू -केतू), वाटा (वाटणी) - वाटा (रस्ते),इत्यादी द्वैर्थी शब्दांची योजमा त्यांनी केली आहे.

उपमा - रुपके -

उपमा रुपकांचा वापरही यशवंतांनी मोठ्या प्रमाणात केला आहे. त्यांनी वापरात आणलेली उपमा रुपके प्रामुख्याने निसर्गातील असतात. राखेचा निखारा, वावटळीतला पाचोळा, वारुळातील मुंग्या, कबुतरे, मधमाश्या - फुले, अथांग जळ, त्याच्या लहरी, आकाश, भडकत्या ज्वाळा, महापुरात धारेला लागलेली नाव, पानावरुन गळणारे थेंब, पौर्णिमेचा चंद्र, तारे. इत्यादी प्रकारच्या उपमा येतात. त्याशिवाय खास घरगुती जीवनातील गोपत्तींच्याही उपमा ते देतात. -

(१)सरली शिक्षा आणि उतरले अंगावरले कपडे ,

वदनप्रक्षालनी जशी ती डोळ्यांवरली चिपडे.

(२)पुन्हा एकदा बिगुल होता डब्यात सारे शिरती ,

कबूतरे ज्यापरी पटापट खुराड्यामध्ये घुसती.

(३)वसाहती वेगे करती गादीत,

रूधिर-पिपासू ढेकूण पिसवा

(४) पान उकळत्या तेलामाजी तळमात्र न ठरे जागी.

(५)फिरविणे ज्यापरी केरसुणी पोतेरे.

अशा वैचित्र्य दाखविणाऱ्या उपमाही अगदी सहजपणे यशवंत वापरू शकतात. याशिवाय कल्पनेचे सौंदर्य व्यक्त करणाऱ्या उपमाही त्यांनी भरपूर वापरल्या आहेत.

(१)हे मधुप फुलांभोवती

डोलती जसे गुंजती

लोभले तेबि सोबती.

(२)किती अथांग जळ हे दिसे

तव अगाध अनुरागसे.

(३)सागरच्या लाटा खळखळतात

कोटी कोटी काय पालवीतो हात.

(४)सुवासिक फुलांचाच सडा काय भाषण तुझे.

रुपक योजनेच्या बाबतीतही सौंदर्याचेच दर्शन घडते.

अश्रु बिंदू शिशु नयनांमधूनी

टपटप खाली गालांवरुनी

ओसरले जणू गगनातूनी

तारका तुटती की फूले वेलीची गळती

प्रेमकवीतेत त्यांनी नायीकेच्या शरिरसौंदर्याचे वर्णन फारसे केले नसले तरी जे काही केले आहे ते करताना ज्या उपमा वापरल्या आहेत त्यातून त्यांच्या कलासौंदर्याचे दर्शन घडते. गाल - प्राजक्त पुष्पासारखे नाजूक ; अधर - व्रारूणीचे पक्वफळ ; कपाळ - अरुणी ; कांती - हिऱ्यामोत्यांची ; गळा - कापून ठेवलेल्या गजदंतासारखा आणि प्रेयसीला त्यांनी दिलेली नावेही विविध आणि विपूल आहेत. - तिच्या अंगी असणारे गुण त्यातून व्यक्त होतात. पण एक प्रकारे त्या उपमाही आहेत - हेमलता, हंसी, हिमांगी, कुसुम, कोमल, सृष्टीसुंदरी, भामीनी, नंदिनी, कल्पवल्लरी, इत्यादी.

**(४) काव्यात भेटणारे विशेष तपशील** - उदा. - पुराणातील दाखले -

यशवंत कवितेच्या ओघात मध्येच पुराणातील गोष्टींचा उल्लेख व्यक्त करतात. नव्या संकल्पना, नवे विचार मांडताना 'जसे पुर्वी झाले होते' त्या आविर्भावाने ते पुराणातील कथांचा सहजतया संदर्भ उपलब्ध करुन देतात. याचे प्रमाणही खुप आहे. रामयण, महाभारत, पौराणीक कथा, दहा अवतार, समुद्रमंथन इतकेच नव्हे पेशवाईतील काही घटनांचे ते उल्लेख करतात. याला कारण म्हणजे ते पुर्वीपासून जुन्या परंपरेतच अधिक मुरले आहेत. त्यामूळेच जुन्या प्रतीमा प्रतीकांच्या आधारेच ते बोलू लागतात. यातील उपमाही ते वापरतात. उदा. कांचनाच्या मृगापरी, इन्दुमतीसम, कुरुक्षेत्र, वाल्मीकी इत्यादी. बालहनुमंताने सुर्य पकडण्याचा प्रयत्न केला, राम शोधण्यासाठी माळेतील मणी फोडले हे उल्लेख येतात. महाभारतातीलही भीष्म, कृष्ण, अभिमन्यू ही व्यक्तिनामे, कालीयामर्दन, कृष्णजन्म, द्रौपदीची थाळी इत्यादी प्रसंगाचे उल्लेख येतात. समुद्रमंथन, मेरुमंदार हे पर्वत, सुरासुर इत्यादींची उपमा अगदी साध्या साध्या गोष्टींनाही दिली आहे.

(१) हि भाळावरली स्फुरण पावे शरिर

कि सिंधुमंथनी गिरगीरतो मंदार

(शिर कपाळावरती - कमंडलू)

(२) सिंधू आटले किती शाईचे

बोरु मेरु मंदाराचे

(युगंधराचे पालुपद - पाणपोई)

तसेच वराहावरात देवाने पृथ्वी आपल्या सुळ्यावर तोलून धरली, स्वप्नातल्या वचनासाठी हरिश्चंद्राने राज्याचे दान केले, राहु केतु, ऋषी अगस्ती ,त्रिपुरांतक, दंडकारण्य, इंदिरा, सती, इत्यादी उल्लेखही येतात. पेशवाईतील पराक्रमी व्यक्तींच्या नावाचाही वापर केला आहे. या सर्वांतून यशवंत जुन्या परंपरेशी किती एकरुप झाले होते हे दिसते.

**(५) वृत्तजातींचा वापर -**

यशवंतांची बहुतेक कविता छंदोबध्द आहे. यशवंतांवर पूर्ववयात संस्कार झाले ते जुन्या पंडिती वळणाच्या कवितेचे आणि रविकिरण मंडळाची कविताही प्रामुख्याने छंदोबध्दच होती. उलट रविकिरण मंडळाने काही नवीन वृत्त जातींची निर्मीती केली. ही पार्श्वभूमी यापाठीमागे आहे. आपल्यावर संस्कार झाले ते जुन्या वृत्तबध्द कवितेचेच. त्यामुळे कविता सुचतानाच आपल्या वृत्तात सुचते असे यशवंत म्हणतात. पण विशिष्ट वृत्ताचा वापर करायचा म्हटले कि मात्रांचे आणि गणांचे बंधन आले आणि त्यामुळे कुठे कुठे कारागीरीचा भागही येणे अपरिहार्यच. शब्दांवर अर्थवाहीत्वापेक्षा वृत्तांची जबाबदारी मोठी असल्याने त्यांची मोडतोडही झालेली दिसते. शेवटचे अक्षर जुळविण्यासाठी अनावश्यक असलेला अर्थही प्रकट करणारे शब्द येतात पण यशवंतांचे कौशल्य असे कि अशी फारशी दोषस्थळे त्यांच्या कवितेत निर्माण झाली नाहीत.

गद्य आणि पद्य यातील अंतर छंदामुळे स्पष्ट होते. एरवी गद्य विचारही पद्यबध्द करता येतो.'छंद' हा कवितेवर केवळ आरोपीत आहे असे नसून कवितेच्या जन्माशीच त्याचा संबंध आहे.(७) कविता ही लयबध्द असते व छंद ही लयबध्दता कवितेला प्राप्त करुन देतो. यशवंतांनी आपली सगळी कविता छंदातच लिहीली आहे. जाती,वृत्ते,छंदांचा भरपूर वापर त्यांनी आपल्या कवितातून केला आहे. जुन्या वृत्त जातींबरोबरच रविकीरण मंडळाने नवीन निर्माण केलेल्या वृत्तजातींचाही वापर यशवंतांनी आपल्या कवितात केला आहे. माधव ज्यूलीयनांच्या प्रमाणे सुनीत रचनाही त्यानी

विपुल केली आहे. गज्जल हा माधवरावांनी आणलेला काव्यरचना प्रकारही स्विकारला आहे पण त्याचे फारसे आकर्षण त्यांना असावे असे दिसत नाही. त्यांनी आपल्या सर्वच कवितात छंदोबध्दता स्विकारली आहे. पण तीही तितक्याच विविधतेने.त्यांनी आपल्या कवितातून वापरलेल्या जाती,वृत्त,छंद,चाली यात बरीच नावे आहेत.

(१) जाती -

मोहिनी, शुभवदना, पुष्पीता, मुद्रिका, माधवकरणी, शुर्पणखा ,श्यामाराणी, युवतीभूषण , पादाकुलक, भुपतीवैभव, गज्जल, वल्लभा, समुदीतमदना, प्रणयप्रभा, दोहा, चंद्रकांत, हरीभगीनी, इंदुमुखी, लवंगलता, रसना, नवती, बालमुकुंद, दिंडी, अवणी, उध्दव, रक्षा, भरतखंड, घोर रजनी, स्नेह-सागर, महावती, अंजनी, वरमंगला, पुष्पिता, नववधू, धवलचंद्रिका, सृष्टीलता, नगराज, भुपती, अभिमन्यु, दासी, साकी, अरुण, बालानंद अशी जवळजवळ चाळीस एवढया जातींचा उपयोग विविध कवितातून केला आहे.

(२) वृत्ते -

सुरनिमग्ना,देवप्रिया,भुजंगप्रयात,वियोगिनी,वसन्त, शार्दुलविक्रिडीत, श्यामला,वसंततिलका, शिखारीणी,वियद्गंगा, व्योमगंगा, भ्रांत,मंदारमाला,वागीश्वरी,रात्रीवितान,इत्यादी.

(३)छंद -

देवद्वार,देवीवर,षडाक्षरी,अभंग,जगरहाटी,ओवी,स्मर-कंद,भूपाळी,गजवदन, इत्यादी. काही कविता रागबध्दही आहे. या रागबध्द कवितेमागील भूमिका त्यांनी म.गो. रानड्यांना लिहीलेल्या एका खाजगी पत्रात लिहीली आहे - ''त्या त्या कवितांची निर्मिती, जे सूर माझ्या मनात घोळत असताना झाली. त्या सुरावर त्या कविता गायिल्याने त्यातील भावना अधिकपणाने प्रचीतीस येतील अशी माझी समजूत आहे........ कथनातील शब्द ज्या सुरांच्या संस्काराने प्रगट झालेले असतात त्याच सुरावर ते कवन गाईले जावे हे 'अधिकस्याधिकम् फलम्' या न्यायाने विहीत होय आणि एवढ्यासाठी त्यासुरावटीला, चालीला कोणत्या रागमानाने ओळखले जाते तेवढे समजून घेऊन त्याचा उल्लेख कवितेच्या शिरोभागी केलेला आहे. (८)

अशी राममानाने म्हणजे - लीलारति आणि भूपतीवैभव मिश्र, दोहा - समपाद, मिश्र पहाडी, यमन इत्यादी.

याबरोबरच काही कवितांवर कविता कोणत्या चालीवर म्हणायची त्या चालीही दिल्या आहेत.

(६) समकालीतांचा प्रभाव -

रविकिरणमंडळाच्या तसेच इतर समकालीन कवितेच्या भाषेचा प्रभाव यशवंतांच्या भाषेवर पडला आहे. काळाच्या काही प्रवृत्ती असतात त्याचा प्रभाव त्या काळातील व्यक्तीवर पडत असतो, टिळक, गोविंदाग्रज बालकवी गेल्यावर त्यांच्या तोडीचा दुसरा प्रतिभसंपन्न कवी त्यावेळी निर्माण झाला नव्हता. आणि केशवसुतांनी कवितेत मांडलेल्या विषयांचा आणि विचारधारेचा प्रसरणशीलतेचा हा काळ होता. त्यामुळे भाषेतही बदल झाले. रविकिरणमंडळाने अनुस्वाराऐवजी संस्कृतमधील परसवर्णांचा वापर केला. तसेच अनुस्वाराचा वापर करताना ण, म, या व्यंजनांचा वापर केला. कवितेत गेयता आणली. छंदोबध्द रचनापध्दती स्वीकारली स्वत: काही नवीन छंदांची निर्मिती केली. या सर्वाचा प्रभाव यशवंतांवर पडला आहेच. पण या समकालीनांच्या पेक्षा प्रभाव आहे तो पंडिती कविता, आणि रामदासांचे वाङ्मय, यांचा यामुळे त्यांच्या कवितेची भाषा इतरांहून वेगळी वाटते. ग्रामीण भाषेतील शब्दांचा वापरही त्यांच्या कवितेत होतो. पौराणीक कथांतील संदर्भ येतात. पण माधवरावांच्या कवितेच्या प्रभावाने फारसी शब्दयोजनाही त्यांच्या कवितेत येते. सुनीतरचना, गज्जल हे वृत्त हा ही माधवरावांच्याच प्रभाव होय. रविकिरणमंडळाने काव्यगायनाची प्रथा सुरु केली त्यामुळे कवितेची मांडणी हा गेय स्वरुपात करावी लागली. यशवंतांनीही आपल्या कवितेत गेयना आणली आहे. त्यासाठी छंदोबध्द कविता लिहून यमकाचा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. रविकिरण मंडळाने केलेले रचना विषयक प्रयोगही स्वीकारलले आहेत. रविकिरण मंडळात आल्यावर त्यांच्या कवितेचे स्वरुप बदलले. कवितेला नवीन विषय मिळाले. याचाही परिणाम त्यांच्या कवितेच्या भाषेवर झाला.

(७) रसपरिपोष -

यशवंतांनी कवितेत वीर, करुणा, वत्सल, शृंगार आदी रसांचा परिपोष केलेला आहे. करुणा आणि वत्सल्य हे त्यांच्या मनाचे मूळ गुणधर्म असल्याने या दोन रसांचा परिपोष चांगला झाला आहे. समाजातील, दंभावर, विकृत गोष्टींवर तूटून पडताना, परकीयांविरुध्द दंड थोपटून उभे राहताना तसेच इतिहासातील पराक्रमाचे गुणगान करताना वीर रसाला भरते येते. दीन दलितांच्या हालअपेष्टांचे वर्णन करताना, करुण भावाचे दर्शन होते. कौटुंबिक कवितांतून वत्सल भावाचे दर्शन घडते तर प्रेमकवितेतून शृंगाराचे दर्शन घडते, पण त्यांच्या कवितेत येणारा शृंगार हा संयमितरित्या व्यक्त होताना दिसतो.

वीर -

देशात पारतंत्र्याचे वारे वाहात असताना इंग्रजी सत्तेशी लढा देण्यासाठी देशातील तरुणांच्या वीरत्वाला आवाहन

करणे गरजेचे होते. हे आवाहन करणाऱ्या कवितांतून वीर रसाचा परिपोष झाला आहे. 'देहाचा पूल' ही कविता अशा प्रकारची एक, चालून आलेल्या मूसलमान सरदाराचे परिपत्य करण्यासाठी शिवाजी महाराज त्याच्यावर चालून गेले पण त्याने आपल्या छावणीभोवती आगीचा खंदक खोदून ठेवला होता. तो ओलांडून जाणे अवघड होते. जवळ पाणीही नव्हते. त्यावेळी चार मावळ्यांनी त्या खंदका झोपून शिवरायांना खंदकाच्या पलीकडे जाण्यासाठी रस्ता करुन दिला. ही घटना वीरत्वाला आवाहन करणारीच आहे. स्वराज्यासाठी अशी आत्माहुती त्या चार मावळ्यांनी दिली आताही पारतंत्र्याचाच काळ आहे निराश करणाऱ्या परिस्थितीमुळे शरणागती पत्करण्यापेक्षा तिच्याशी लढायला तयार झाले पाहिजे, देशभक्तीच्या अनन्यतेचा पुन्हा आवेश पिकला पाहीजे असे कवी म्हणतो. तर खंलानो तुम्ही कसलाही व्यूह रचला तरी त्याला उल्लंघून आम्ही जाऊ, तुम्ही कसाही मारा चालवला तरी आम्ही जराही ढळणार नाही. आमच्या मस्तकी वज्राची ढाल असेल. असा वीरत्वाचा आशय ते व्यक्त करतात. 'छत्रपती शिवराय' हे काव्यतपर पूर्णपणे वीरसानेच भरलेले आहे.

**करुण -**

वीर रसासोबतच कारुण्याचे चित्रणही येते. दीन दलित पिडीतांचे दु:ख पाहून कवीच्या मनात करुणा उत्पन्न होते. गुलामाचे गाऱ्हाणे म्हणजे शोषितांची कैफीयत होय, तळागाळातल्या लोकांची पिळवणूक उच्चवर्णीय करतात. बैलाच्या प्रतिकातून हा आशय ते व्यक्त करतात. त्याचे दु:ख हृदय पिळवटून टाकते. जमातील अपमान, जगाची उफराटी तऱ्हा यामुळे कवीला निराशा येते तो मृत्यूची आळवणी करतो त्यातूनही करुण रसाचेच दर्शन होते. त्यांची 'आई ' कविता म्हणजे करुण रसाचा उत्कट बिंदूच. आईविना पोरक्या मुलाचे हे कारुण्याने थबथबलेले बोल कुणाच्याही हृदयाला हात घालतात.

**वत्सल -**

यशवंतांच्या कौटुंबिक कवितांतून वत्सल भावाचे दर्शन घडते. वात्सल्य हाच त्यांच्या मनाचा मूळ धर्म असल्याने त्यांनी कौटुंबिक कविता लिहीली आहे. आई-मुलातील वात्सल्याचे दर्शन विशेष उत्कटताने घडते. 'मारु नको ग' आणि 'झोपलेला बालक पाहून' या दोन कवितातून आई-मुलातील विचित्र प्रेमाचे दर्शन घडते. आई मुलावर रागावून त्याला मारते. मारु नको म्हणून मूल रडतरडत तिला विनविन असते. त्याचा फुलासारखा चेहरा रडण्याने म्लान झालेला पाहताच आईला स्वत:च्या चुकीची जाणिव होते. त्याला मारायचे बंद करते आणि उचलून पोटाशी घेते. तिला रडू येते. मूलही मग विचारते की तुला कुणी मारलं म्हणून तू रडत आहेस. हे ऐकून तर तिच्या प्रेमाला विशेषच भरते येते.

तर मूल जागे असताना खूप दमवते म्हणूनमी रागावते मात्र तो झोपलेला बालक पाहून मात्र तिला त्याच्याबद्दल जास्त वात्सल्य वाटू लागते. याशिवाय अशा प्रकारच्या माता-पित्र-मूल यांच्यातील प्रेमाचे धागे उकलून दाखविताना वात्सल्य रसाचा परिपोष झाला आहे.

शृंगार -

यशवंतांच्या कवितेत येणारे शृंगाराचे चित्रण हे अतिशय सौम्य आहे. त्यांना ज्या प्रेमाचे चित्रण करायचे होते ते पूर्णपणे शरीर निष्ठहीनव्हते की पूर्णपणे शरीर निरपेक्षही नव्हते. प्रेमात शरीरापेक्षा मनाला महत्व दिले. मनाचे मिलन आधी नंतर शरीराचे असे मानले. त्यामुळे नायिकेच्या शरीर सौंदर्याचे वर्णनही फारसे येत नाही. 'जयमंगला' या खंडकाव्यातही पूर्णपणे शृंगारनिष्ठ अशी प्रेमकथा काव्याच्या कथानकासाठी घेतली असली तरी त्यातील शृंगारीक मात्र पूर्णपणे गाळलेला आह. भावनांच्या आंदोलनांना महत्व दिले आहे. यातील नायक जेव्हा बधस्तंभाकडे जात असतो तेव्हा आपल्या प्रेयसीशी केलल्या प्रेमलीलांची आठवण काढीत असतो त्या लीलांना यशवंत 'अवगाहनलीला' हा शब्द वापरतात. यातून त्यांच्या शारीरीक संबंधापेक्षा काव्यशास्त्र विनोदाचा अर्थच जास्त अभिप्रेत होतो. शृंगाराचे त्यांना बावडे आहे असे नाही पण अनावृत्त शृंगारापेक्षा हृदयामध्ये काहूर माजविणारी प्रेम ही संकल्पना त्यांच्या जास्त आवडीची आहे. त्यांची स्फुट कविताही शृंगारिक नाही. त्यांच्या प्रेमकाव्यातील नायक नायिकेची आळवणी करतो ते तिने येऊन गाढालिंगन देऊन आपली तृषा भागवावी म्हणून नव्हे तर आपल्या आयुष्यातील निराशेचा दाट काळोख तिने घालवावा म्हणनू, ती त्याला स्फूर्तीदायी अशी संसार-सखी व्हावी म्हणून.

भयानक -

युध्दाच्या पार्श्वभूमीवरील भीषण घटनांचे वर्णन करताना भयानक रसाचा परिपोष होतो. वस्तुतः हाही यशवंतांच्या प्रकृतीशी विसंगत आहे. पण तो निर्माण केलेला नाही. भिषणाच्या दर्शनाने त्याचे कवितेत उमटविलेले चित्रही भीषणच झाले आहे. उदाहरणार्थ दसऱ्या महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर लिहीलेली 'चन्द्रम्या' ही कविता. युध्दीतील संहाराचे रौद्रभीषण चित्र येथे उमटले आहे. -

आमुच्या पहा रे पूर्व नि पश्चिम भागी
कोसळती शहरे आणि भडकती आगी
तडफडती सडती प्रेते जागोजागी.
जणु धरा रौरवा व्याली.

स्फोटाने शकले उठती अस्मानात, किंचाळति समरी मरणोन्मुख विच्छिन्न, आणि तडफडती सडती प्रेते जागोजागी. यातून बिभत्साचेच दर्शन घडते. या दर्शनाने मती गुंग होते. पण या रसाचे दर्शन घडविणारी अशी एखादीच कविता.

वत्सल रस सोडला आणि काही प्रमाणात करुण रस सोडला तर वीर, शृंगार, भयानक रसांचे चित्रण हे सौम्य रितीनेच झाले आहे.यशवंत हे सत्य, शिव, सुंदराचे, जिवनातील मांगल्याचे उपासक आहेत. त्यामुळे, त्यांची कविता जीवनात मांगल्य निर्माण करण्यासाठीच बहुधा जन्म घेते. त्यामुळे ती नेहमीच संयत असते.

**(८) भाषेचे सहज, स्वाभाविक वळण -**

यशवंतांनी आपल्या कवितेत, विविध जाती, छंद, वृत्ताचा वापर केला आहे. यमकांची भरपूर वापर केला आहे तरी तंत्रात कविता कोंबल्यामुळे करावी लागणारी तडजोड त्यांना फारशी करावी लागली नाही. तंत्रदृष्ट्या कविता लिहीली असली तरी ती तितकीच आशयाने समृध्द असते. त्याचे कारण म्हणजे आपल्याला कविता स्फुरतानाच मुळात छंदात सुचते असे ते म्हणतात. (९) त्यामुळे कदाचित त्यांना भाषेत मोडतोड करावी लागली नाही. त्यांच्या भाषेचे सहज, स्वाभाविक वळण कायम राहिले. कविताच छंदात स्फुरल्याने ती व्यक्त होताना तिच्यात सहजता आली. आणि फॅशन म्हणून किंवा लोकप्रियतेसाठी म्हणून नवीन शब्दांचा भरणा त्यांनी आपल्या कवितेत केला नाही. स्वत:ची भाषाच कवितेसाठी वापरली त्यामुळे भाषेचे स्वाभाविक वळण कायम राहिले. यती, गंणाचे आणि यमकाचे बंधन असूनही कवितेत अर्थहानी कुठे झालेली नाही की यमकासाठी तडजोड करावी लागली नाही. लागली असली तरी अशी कविता फार विरळा, त्यांची कविता ही पूर्णपणे गाणे नसते ती गद्यप्रायच असते पण त्यात एक नाद, लय असते. ती त्या तालावर वाचता गाता येते. त्यांच्या भाषेवर नवीन कुणाचा प्रभाव नाही त्यामुळे भाषेत बदल होत नाही.'' त्यांनी भाषेमध्ये संगमरवरी घोटीवपणाही येऊ दिला नाही. ती अर्थवाहनाला समर्थ आणि लवचिक आहे.'' (१०) कवितेत जे उपमादृष्टांत वापरतात तेही आशयाशी विसंगत नसतात. तसेच बोजड शब्दांचा सोसही त्यांनी धरला नाही. त्यामुळे त्यांची भाषा सहज व स्वाभाविक वाटते. आणि विशेष ही भाषा सर्व सामान्य माणसाच्या भावनाच कवितेतून व्यक्त करते. तसेच आपल्या अनुभूतीशी, भावनांशी कवी एकनिष्ठ असल्याने बहुतांशी स्वत:चीच भावना, स्वत:चेच अनुभव तो काव्यात प्रकट करतो त्यामुळेही कवितेला सहजता प्राप्त होते.

**(९) कवितासंग्रहाची व कवितांची शीर्षके -**

आतापर्यंत कवितेच्या भाषेविषयी विवेचन केले. कवितांची शिर्षकही कवीच्या भाषिक वैशिष्ट्याचीच निदर्शक होत. कवीच्या काव्यसंग्रहाच्या बहुतेक नावात कवीच्या स्वत:च्या नावाचा उल्लेख आहे. यशवन्ती, यशोगिरी, यशोनिधी,

यशोगंध, यशोधन, इत्यादी नावातून कवितेच्या निर्मात्याविषयी माहिती व्हावी. 'ओजस्वीनी' द्वारे कवितेची प्रकृती कशी आहे ते प्रकट होते. 'पाणपोई ' द्वारे काव्यामागील, तृषितांना तृप्त करण्याची भावना ही स्पष्ट होते 'कमंडलू' मध्येही पाणीच आहे पण ते तीर्थोदक आहे. आणि पाणपोईच्या इतका पाण्याचा साठा त्याच्याकडे नाही. हा आशयचक त्यातून व्यक्त होतो. 'कमंडलू' हा त्यांचा शेवटचा कवितासंग्रह. खंडकाव्याची नावेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'जयमंगला' नावातूनच त्याची अद्‌भुतरम्यता प्रकट होते. 'बंदिशाळा' हे नावावरुन काव्याच्या विषयाचा बोध होतो. पण दुसरा विस्तृत अर्थ व्यक्त करण्यासाठी कवी 'जग हे बंदिशाळा' असे काव्यात सतत म्हणत असतो. 'काव्य-किरिट' म्हणटल्याने अर्थहानी झाली आहे. सर्व काव्याचा मुकुट असा अर्थ या नवातून अभिप्रेत होतो. कवितांची शिर्षकेही, काव्य प्रसंगावर्णपर, व्यक्ती अथवा वस्तूचे आत्मगीत, वैचारिक आहे हे दर्शविणारी असतात. मात्र शिर्षकावरुन केवळ आशयाची कल्पना येत नाही. उदा. 'चंद्रम्या' कवितेचा आशयच युध्दाची भिषणता दर्शविणारा आहे हे कविता वाचल्यावरच कळते. साध्या शब्दांतूनही मोठा आशय व्यक्त करतात. पण बहुतेक कवितांची शिर्षके ही कवितेचा आशय अंशत: तरी प्रकट करताना दिसतात - मृत्यूला म्हणतो सबूर, झोपलेला बालक पाहून, हा बालक बसला कागद टरकावीत, गृहीणी मी, नच देवी, गुलामाचे गाऱ्हाणे, नसे जग सर्वस्वी अनुदार, दिंवगताचे स्मारक, आंधळा झालो तर, तुरुंगाच्या दारात, सत्य न मरते दळभारे, द्या आम्हाला सुळी, इत्यादी पण कवितेचा आशय व्यक्त करायला अशी मोठी शीर्षकेच असणे गरजेचे नाही. लहान शिर्षकातूनही हे काम साधते. आई , माझा महाराष्ट्र, पाणपोई, लिलाव, मातृपदाविण, नौकाविहार बालगंधर्वास, इ. पण ती कधीधी अनेकार्थसूचकही असू शकतात. अजुन, इशारा, घर, मांडणी, कसोटी, बाणा इत्यादी पण बहुधा ती आशयसूचक आणि समर्पकच असतात.

यशवंतांच्या भाषाशैलीची स्वरुप वैशिष्ट्ये आपण येथवर पाहिली. यशवंतांची भाषा ही प्रामुख्याने प्रासदिक आहे. पण तरीही सौंदर्यशाली ही आहे. तिचे सौंदर्य तिच्या स्वाभाविक अविष्कारात दडलेले आहे. पण सुट्या सुट्या शब्दांचा विचार करावयाचा झाल्यास संस्कृतचा प्रभाव त्यांच्यावर जास्त जाणवतो. संस्कृत शब्दांचा भरणा त्यात फारसा नसला तरी पंडिती वळणाने कविता लिहील्याने तो विशेष जाणवतो. हिंदी, उर्दूच्या व फार्सी भाषेचा काही प्रमाणात त्यांच्यावर प्रभाव आहे. ग्रामीण भाषेचा उपयोग ग्रामीण भाषेच्या प्रभावातून केला गेला नाही. मूळ संस्कारातूनच झाला आहे. खरे तर वरील सर्वच भाषेतील शब्दांचा उपयोग त्या त्या भाषेच्या अंशत:का होईना संस्कार झाल्यानेच आला आहे. कारण कवितेत शब्द हे कवीचे स्वत:चे असावे लागतात. शब्दातील अर्थ आणि माधुर्य कळले तरच ते शब्द वापरल्याने काही अर्थनिष्पत्ती होते. केवळ वेगळेपणासाठी यशवंतांनी परभाषीय शब्द कवितेत वापरलेले नाहीत. पंडित्यप्रदर्शन दिसेल इतका अलंकारांचा वापर केलेला नाही, शब्दाच्या नादाचे त्यांना वेड आहे त्यामुळे नादमयता

निर्माण होण्यासाठी कुठेकुठे अर्थहानी पत्करुनही अनुप्रासात्मक रचना केली आहे. यमकाचा वापर तर खूपच केला आहे. यमकाशिवाय कविता सापडणे विरला. सर्व कविता छंदोबध्द लिहीली आहे. मुक्तछंदही वापरुन बघितला आहे. यशवंतांच्या भाषिक वैशिष्ट्यांचा आढावा स्थूल रुपाने आपण घेतला त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारे भाषा विशेष पुढील प्रमाणे -

१) यशवंतांनी प्रासंगिक आणि प्रसंगापर कविता फारशी लिहीली नाही. कथात्मकतेपेक्षा भावनात्मकेचे त्यांना वेड आहे त्यामुळे त्यांच्या कवितेची भाषाही आकर्षक दिसण्यासाठी शब्दांची कारागीरी करताना दिसत नाही.

२) निव्वळ वर्णन वेधक करण्याकडे यशतंतांनी भर दिलेला दिसत नाही आणि कल्पनेच्या उंचच उंच भराऱ्याही नाहीत. वास्तवाशी इमान राखले असल्याने त्याचा प्रभाव त्यांच्या कवितेच्या भाषेवरही जडलेला दिसतो.

३) सुरुवातीची कविता अवजड आणि बोजड भाषा घेऊन येते. जुन्या काव्याचे संकेत मनात असतील त्यामुळे चतुर्दशरत्नमाला, विमलाम्बुधरा, वरिसि, जेधवा, तेधवा, त्वत्पदसंवाहना, स्तन्यसुधा, गेही इत्यादी शब्द कवितेत येतात. पण अशा क्लीष्ट शब्दरचनेबरोबरच करमते, राजा, पोपट, कोकरु, ताइत, दांडगा, पुंडावा, मारेकरी, वाव, खुळा, तोंड, वापी इत्यादी ग्रामीण भाषेतले शब्दही येतात. (भावमंथन)

४) अनुस्वाराऐवजी परसवर्णांचा वापर हा रविकिरण मंडळातील सर्वांनीच केला तसा यशवंतांनीही केलेला दिसतो. उदा. सङ्कोच, जयमङ्गला, पङ्ख, अङ्गच, बान्धा, कमण्डलू इत्यादी.

५) यशवंतांनी यमकाचा खूप वापर केलेला आहे. यमकाशिवाय त्यांची कविता सापडत नाही. अपवादात्मक एखादीच (संकोच-भावमंथन)

६) वृत्तांच्या विशिष्ट तंत्ररचनेत कविता कोंबल्यामुळे आणि शिवाय गेयता हा ही एक भाग होताच त्यामुळे कविता अभिव्यक्त होत असताना कवितेवर काही बंधने पडलेली दिसतात.

७) सुरुवातीच्या दोन ओळीत व्यक्त केलेली भावनाच निरनिराळ्या उपमादृष्टांतातून पुन्हा व्यक्त केली जाते. त्यामुळ पुन रुक्तीचा दोष निर्माण झालेला दिसतो. त्यामुळे कवितेतील आवाहन नष्ट झालेले

दिसते. भावनेचे सच्चपण जाणवत नाही आणि कवीची निश्चित भूमिका व्यक्त होत नाही. पण तरीही काही कविता यशस्वी वाटतात. त्यातील दाहक आशयामुळे उदा. 'जगरहाटी' ही कविता.

८) अतिशयोक्तीचा वापर केलेला नाही. भडक वर्णने नाहीत आत्मानुभूतीवर आधारलेली अशी कविता असल्याने कृत्रिमता जाणवत नाही.

९) वर्णन वेधक करण्याकडे जास्त कल नाही. त्यामुळे भाषेला कृत्रिमपणा आलेला नाही भावनात्मकतेला आवाहन करणारी भाववाही अशी भाषा त्यांनी लिहीली आहे.

१०) संस्कृत भाषेतील शब्द, नागरी फॅशनचे शब्द, मुलांच्या भाषेतील शब्द, ग्रामीण भाषेतील शब्द, दैनंदिन व्यवहाराची भाषा यांची दहीमिसळ झालेली दिसते.

११) यमकाच्या सोसाने भिन्न प्रकृतीचे शब्द एका खाली एक मोजावे लागले आहेत. पण तरीही अर्थहानी होऊन दिली नाही.

१२) काव्य छंदात कोंबल्याने क्वचित काव्यात गद्यप्रायताही आलेली दिसते.

१३) यशवंतांच्या भाषेवर संस्कृत, इंग्रजी, फारसी, भाषांचा प्रभाव नाही. पण या प्रभावातून ती पूर्णपणे सुटलेलीही नाही. तरीही त्यांच्या भाषेचं मराठमोळेपण लक्ष वेधून घेतं.

१४) यशवंतांनी यमकांची खैरात केलेली आहे तशी उपमांची नाही. पण शोध घेतल्यास उपमेतही ते मागे नाहीत असे दिसते.

'जयमंगलेत' प्रेयसीला किती नांवानी पुकारले ? -

- स्मितानने, कष्टहारी, स्नेहशीला, संगीतकारी, संवादी-सखी, मनोदेवता, ललिता, हंसी, कविप्रतिभा, सुगंधा, लीला, भगिनी स्वामिनी, पण हा एकत्रित समुच्चय नव्हे. तो तुटक तुटक आणि प्रसंगेचित्रच योजना असल्याने उपरा वाटत नाही.

१५) यशवंतांची भाषा प्रसन्न आणि सुबोध आहे भावना आणि विचार व्यक्त करण्यासाठी त्यांना शब्द शोधावे लागत नाहीत. ते मुळापासूनच तयार असल्याचे जाणवते.

१६) सुरुवातीच्याकालखंडातील कवितेची भाषा आणि नंतरच्या कवितेची भाषा यात फारसा फरक नाही त्यांच्या भाषेची घडण निश्चित आणि भक्कम असल्याचे दिसते.

१७) नव्या प्रतिमांचा त्यांना बळजबरीने अनुनय करावा लागलेला नाही. ते जुन्या परंपरेत संस्कृतीत इतके मुरले आहेत की नवे विचार, नव्या भावना, नव्या समस्या या जुन्या प्रतिमा प्रतिकांच्या, पौराणिक दाखल्यांच्या आधारेच मांडताना दिसतात.

यशवंतांच्या भाषेच्या स्वरुपाचा विचार काही अंगाने येथपर्यंत केला. सुरुवातीच्या निवेदनात राहून गेलेल्या वैशिष्टयांच्या विचारही या समग्र वैशिष्ट्यांत केला. यातून यशवंतांच्या भाषेचे एक वैशिष्ट्य तर सहजपणे जाणवते ते म्हणजे त्यांच्या भाषेचे सहज स्वाभाविक सात्वीक मराठमोळपणे, ज्यामुळेच त्यांची कविता जनमानसात अधिक रुजली आणि अधिक फोफावलीही.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'मराठी कविता स्वरुप आणि विवेचन' | : | निशिकांत ठकार - स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती नोहे १९७७. पृ. ६९ |
| २) | तत्रैव. | : | पृ. ७१ |
| ३) | 'साहित्याची भाषा' | : | भालचंद्र नेमाडे , अनुष्टुभ् मे जून १९८६, पृ. १० |
| ४) | उनि. | : | मराठी कविता स्वरुप आणि विवेचन, पृ. ८३ |
| ५) | 'त्रिज्या' | : | नागनाथ कोतापल्ले, प्रोग्रेसिव्ह को. ऑप पब्लिकेशन्स सोसायटी लि. औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९७८, पृ. ७७ |
| ६) | उनि. | : | साहित्याची भाषा, पृ. १० |
| ७) | उनि. | : | मराठी कविता स्वरुप आणि विवेचन, पृ. ७७ |
| ८) | 'यशोगंध' | : | यशवंत, प्रकाशक य.दि. पेंढारकर पुणे -२, जानेवारी १९३५, पहिली आवृत्ती प्रस्तावना - म.गो. रानडे, पृ. १२ |
| ९) | 'साहित्यिक गप्पा दहा साहित्यिकांशी' | : | जयवंत दळवी सन पब्लिकेशन्स प्रथमावृत्ती १९८५, पृ. १५८ |
| १०) | 'अर्वाचित मराठी काव्य' | : | रा.श्री. जोग, मुंबई मराठी साहित्य संघ, द्वितीय आवृत्ती १९५९, पृ. २०९. |